# जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर
## खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
## नोंदनी क्रमांक — ई-3342/2017 दिनांक 27/11/2017

आदेश क्र. जिखप्र/प्रमा-कौशल्य विकास आणि उपजिविका निर्मिती/३९४/2025
दिनांक-04 / 11 /2025

**प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश**

विषय- प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत **"कौशल्य विकास व उपजिविका निर्मिती"** या शिर्षकाखाली पेंच जलाशयात प्रायोगिक तत्वावर गोडया पाण्यातील झिंगा (Macrobrachium Spp) बिज संचयन करणे या कामाला प्रशासकीय मान्यता व निधी वितरण.

वाचा-
1. भारत सरकार, खाण मंत्रालय, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY) यांचे सुधारित मार्गदर्शक सुचना दिनांक 15/01/2024
2. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग शासन निर्णय क्र. डीएमएफ-0124/प्र.क्र.10/उ-9 मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 11/10/2024
3. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर यांचे पत्र क्र. जा.क्र. मत्स्य/तां-1/5093/2025 दिनांक 04/11/2025
4. प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर यांचे तांत्रिक मंजुरी आदेश पत्र जा.क्र. मत्स्य/तां-3/3380/2025 दिनांक 04/11/2025
5. मा. जिल्हाधिकारी महोदय यांचे दिनांक 04 / 11 /2025 रोजीच्या मंजुर टिपणीनुसार

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 3 पत्रान्वये सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर यांनी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत "कौशल्य विकास आणि उपजिविका निर्मिती" या शिर्षकाखाली नागपूर जिल्हयातील पेंच जलाशयात प्रायोगिक तत्वावर गोडया पाण्यातील झिंगा (Macrobrachium Spp.) बिज संचयन करणे ही योजना राबविणे करीता आकस्मिक खर्चासह अंदाजित किंमत **रू. 24,90,000/- (अक्षरी- रू. चौवीस लक्ष नव्वद हजार फक्त)** रकमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. संदर्भिय पत्र क्र.2 अन्वये प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर यांनी सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

संदर्भ क्र. 5 च्या मंजुर टिपणीनुसार मा. जिल्हाधिकारी महोदयांनी सदर प्रस्तावास मंजुरी प्रदान केलेली आहे.

**नियोजित कामांचे विवरण:-**

| अ. क्र. | तालुका | तलाव/ जलाशयाचे नाव | कार्यान्विती यंत्रणेचे नाव | कामाचे नाव | प्रशासकीय मान्यता रक्कम | या आदेशान्वये वितरीत करावयाचा 20% निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पारशिवनी | पेंच | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर | पेंच जलाशयात प्रायोगिक तत्वावर गोडया पाण्यातील झिंगा (Macrobrachium Spp.) बिज संचयन करणे | 24,90,000 | 4,98,000 | **प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष बाधित क्षेत्र** (उच्च प्राथम्य बाबी) |
| | | | | **एकुण** | 24,90,000 | 4,98,000 | |
| | | | | | | | **( अक्षरी- चार लक्ष अठयानव हजार फक्त)** |

